महाराष्ट्र शासन
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
प्रशासकीय इमारत कृषि नगर, परभणी ४३१ ४०२
कुलसचिव कार्यालय

सत्यमेव जयते

ईमेल : reg_mau@redifmail.com
संकेतस्थळ : www.vnmkv.ac.in

फॅक्सः (०२४५२) २२९७५५,२२३५८२
दुरध्वनीः (०२४५२) २२९७५५

**जा.क्र.जपुती २०२४/साप्रवि-२/20** **दिनांक ०१.०१.२०२४** 02

**सन २०२४ मध्ये राष्ट्र पुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.**

**संदर्भ - शासन परिपत्रक क्र.** GAD-49022/14/2023-GAD(DESK-29) दि.२७.१२.२०२३

## परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सन २०२४ या वर्षात राष्ट्र पुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करणेबाबतचे संदर्भीय परिपत्रक शासनाकडुन प्राप्त झालेले आहे. संदर्भीय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत असुन शासन परिपत्रकात दर्शविल्याप्रमाणे सन २०२४ या वर्षात राष्ट्र पुरूष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन आपआपल्या कार्यालयात सकाळी ११.०० वाजता साजरे करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

तसेच या व्यतिरिक्त खालील दर्शविलेल्या कार्यक्रमाचे देखील आयोजन करावे.

१) ३० जानेवारी हुतात्मा दिन

२) १८ मे विद्यापीठ वर्धापन दिन ( कार्यक्रमाचे आयोजन - संचालक विस्तार शिक्षण)

३) २८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय माहीती अधिकार दिन

परिशिष्टात दर्शविलेले जे कार्यक्रम सार्वजनिक सुटीच्या दिवशी / साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी येत असतील आणि या संदर्भात केंद्र शासनाने कार्यक्रमात बदल सुचविल्यास त्याप्रमाणे साजरे करण्यात यावेत, अन्यथा ते कार्यक्रम त्याच दिवशी साजरे करण्यात यावेत. सदर कार्यक्रमास सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थीत राहतील याबाबत दक्षता घ्यावी.

**मा. कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने.**

**सोबतः- वरीलप्रमाणे**

(धु.को.काळे) 01/01/24
कुलसचिव

**प्रतिलिपी :-**

१. संचालक संशोधन / मा.संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव व कार्यवाहीस्तव.
२. मा.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), / सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) / विद्यार्थी कल्याण अधिकारी, वनामकृवि, परभणी यांना देवुन सुचित करण्यात येते की, १५ ऑक्टोबर हा दिवस डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन, वाचन प्रेरणा दिन म्हणुन प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षीही साजरा करून अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी यांना देवुन सुचित करण्यात येते की, प्रशासकीय इमारतीमधील कर्मचा-यांसाठी उपरोक्त सर्व कार्यक्रमाचे आयोजन हॉल क्रमांक १८ **(Symposium Hall)** मध्ये करावे व त्यासाठी आवश्यक सर्व व्यवस्था राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्तींच्या शासन मान्य योग्य आकाराच्या (फोटो) प्रतिमासह करावी ही विनंती.

४. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि अन्नतंत्र महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांना देवुन सुचित करण्यात येते की, १६ ऑक्टोबर हा दिवस "जागतिक अन्न दिवस" म्हणुन प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी साजरा करून अनुपालन अहवाल नियंत्रण अधिका-यामार्फत या कार्यालयास सादर करावा.

५. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय, परभणी / सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातुर / प्रभारी अधिकारी, उती संवर्धन प्रकल्प, वनामकृवि, परभणी यांना देवुन सुचित करण्यात येते, १४ नोव्हेंबर हा दिवस "जैवतंत्रज्ञान दिन" म्हणुन प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी साजरा करून अनुपालन अहवाल नियंत्रण अधिका-यांमार्फत या कार्यालयास सादर करावा.

**प्रतः**

१. सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव व कार्यवाहीस्तव.

२. मा.नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.

३. सर्व कार्यालय प्रमुख, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

४. सहाय्यक कुलसचिव (आस्था / परीक्षा /साप्रवि) वनामकृवि, परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकाची प्रत सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन देवुन सर्व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

५. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात यावे.

६. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.

७. श्री.एम.डी.शेळके, पहारेकरी यांना विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी यांचे मार्फत.

**सन २०२४ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : GAD-49022/14/2023-GAD (DESK-29)**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २७ डिसेंबर, २०२३.

**परिपत्रक :-**

सन २०२४ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करण्यात यावेत.

२. परिशिष्टात दर्शविलेले कार्यक्रम सार्वजनिक सुट्टी, साप्ताहिक सुट्टी (शनिवार व रविवार) आणि स्थानिक सुट्टीच्या दिवशी येत असतील आणि या संदर्भात केंद्र शासनाने कार्यक्रमात बदल सुचविल्यास त्याप्रमाणे साजरे करण्यात यावेत, अन्यथा ते कार्यक्रम त्याच दिवशी साजरे करण्यात यावेत.

३. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

४. **भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिनाचा समावेश जयंती कार्यक्रमामध्ये करण्याबाबत वेगळयाने शासन परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.**

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३१२२७१६०९१२४२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6BB468A80B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.12.27 16:08:56 +05'30'

**( रो. दि. कदम-पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, उर्जा, राजशिष्टाचार) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अ.मु.स.(प्र.सु.,र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
११. सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१७. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१८. निवड नस्ती ( कार्यासन-२९)

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. GAD-49022/14/2023-GAD (DESK-29)दि. २७.१२.२०२३चे परिशिष्ट

सन २०२४ मध्ये मंत्रालय,शासकीय /निमशासकीय कार्यालयात साजरे करावयाच्या जयंती /राष्ट्रीय दिन कार्यक्रमांची यादी

| अ. क्र. | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ३ जानेवारी, २०२४ | बुधवार | १३ पौष, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २ | जिजाऊ माँसाहेब जयंती | १२ जानेवारी,२०२४ | शुक्रवार | २२ पौष, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी,२०२४ | शुक्रवार | २२ पौष, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी,२०२४ | मंगळवार | ०३ माघ, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ५ | बाळासाहेब ठाकरे जयंती | २३ जानेवारी,२०२४ | मंगळवार | ०३ माघ, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ६ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी, २०२४ | गुरुवार | २६ माघ, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ७ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२४ | सोमवार | ३० माघ, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ८ | बाळशास्त्री जांभेकर जयंती | २० फेब्रुवारी, २०२४ | मंगळवार | ०१ फाल्गुन, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ९ | संत गाडगे बाबा जयंती | २३ फेब्रुवारी, २०२४ | शुक्रवार | ४ फाल्गुन, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १० | संत रविदास महाराज जयंती (माघ पौर्णिमा या तिथीनुसार) | २४ फेब्रुवारी,२०२४ | शनिवार | ०५ फाल्गुन, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ११ | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च, २०२४ | मंगळवार | २२ फाल्गुन, शके १९४५ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १२ | शहीद दिन | २३ मार्च, २०२४ | शनिवार | ३ चैत्र, शके १९४६ | शहीद भगतसिंग,राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे |
| १३ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल, २०२४ | गुरुवार | २२ चैत्र, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२४ | रविवार | २५ चैत्र, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल, २०२४ | मंगळवार | १० वैशाख, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १६ | महात्मा बसवेश्वर जयंती (वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया) तिथीनुसार) | १० मे, २०२४ | शुक्रवार | २० वैशाख, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १७ | छत्रपती संभाजी महाराज जयंती | १४ मे, २०२४ | मंगळवार | २४ वैशाख, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १८ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे, २०२४ | मंगळवार | ३१ वैशाख, शके १९४६ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ घेणे |
| १९ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे, २०२४ | मंगळवार | ७ ज्येष्ठ, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २० | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे, २०२४ | शुक्रवार | १० ज्येष्ठ, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २१ | महाराणा प्रतापसिंह जयंती (ज्येष्ठ शुक्ल तृतीया या तिथीनुसार) | ९ जून, २०२४ | रविवार | १९ ज्येष्ठ, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २२ | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जून, २०२४ | बुधवार | ०५ आषाढ, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २३ | वसंतराव नाईक जयंती | १ जुलै, २०२४ | सोमवार | १० आषाढ, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २४ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै, २०२४ | मंगळवार | ०१ श्रावण , शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २५ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | १ ऑगस्ट, २०२४ | गुरुवार | १० श्रावण, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २६ | क्रातिसिंह नाना पाटील जयंती | ३ ऑगस्ट, २०२४ | शनिवार | १२ श्रावण, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २७ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०२४ | मंगळवार | २९ श्रावण, शके १९४६ | सद्भावना दिवसाची शपथ घेणे |
| २८ | राजे उमाजी नाईक जयंती | ७ सप्टेंबर, २०२४ | शनिवार | १६ भाद्रपद, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २९ | केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती | १७ सप्टेंबर, २०२४ | मंगळवार | २६ भाद्रपद,शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३० | पंडीत दीनदयाळ उपाध्याय जयंती- अंत्योदय दिवस | २५ सप्टेंबर, २०२४ | बुधवार | ०३ आश्विन, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३१ | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर, २०२४ | बुधवार | १० आश्विन, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३२ | लाल बहादूर शास्त्री जयंती | २ ऑक्टोबर, २०२४ | बुधवार | १० आश्विन, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३३ | डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम जयंती | १५ ऑक्टोबर, २०२४ | मंगळवार | २३ आश्विन, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३४ | महर्षि वाल्मिकी जयंती (आश्विन पौर्णिमा या तिथीनुसार) | १७ ऑक्टोबर, २०२४ | गुरुवार | २५ आश्विन, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३५ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर, २०२४ | गुरुवार | ९ कार्तिक, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३६ | वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोबर,२०२४ | गुरुवार | ९ कार्तिक, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | पंडीत नेहरु जयंती | १४ नोव्हेंबर, २०२४ | गुरुवार | २३ कार्तिक, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३८ | बिरसा मुंडा जयंती | १५ नोव्हेंबर, २०२४ | शुक्रवार | २४ कार्तिक, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३९ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर, २०२४ | मंगळवार | २८ कार्तिक, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकात्मता दिवसाची शपथ घेणे |
| ४० | * संविधान दिवस | २६ नोव्हेंबर, २०२४ | मंगळवार | ०५ मार्गशिर्ष, शके, १९४६ | भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करणे |
| ४१ | संत संताजी जगनाडे महाराज जयंती | ८ डिसेंबर,२०२४ | रविवार | १७ मार्गशिर्ष, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४२ | अटल बिहारी वाजपेयी जयंती | २५ डिसेंबर,२०२४ | बुधवार | ०४ पौष, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४३ | वीर बाल दिवस | २६ डिसेंबर,२०२४ | गुरुवार | ०५ पौष, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४४ | डॉ.भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती | २७ डिसेंबर,२०२४ | शुक्रवार | ०६ पौष, शके १९४६ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

१* शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.जपुती-२२०८/१३३८/प्र.क.१०९/०८/२९, दि.२४.११.२००८ मधील सूचनांनुसार विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

************